# मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ यांचे गौणखनिज जप्ती पंचनाम्याबाबत निर्देश

मा. उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपिठाने याचिका (रिट पिटिशन) क्रमांक ६४८१/२०१५, ६४८२/२०१५, ६४१२/२०१५ आणि ६४६८/२०१५ या प्रकरणांत "गौणखनिज जप्ती पंचनाम्याबाबत" काही निर्देश दिले होते. सदरचे निर्देश मा. श्री. अंबरीश जोशी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, नागपुर खंडपीठ, नागपुर यांनी विदर्भातील सर्व मा. जिल्हाधिकारी यांना त्यांच्या दिनांक २९.१.२०१६ च्या पत्रान्वये पाठविले होते.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपिठाने, गौणखनिज जप्ती पंचनाम्याबाबत दिलेल्या या निर्देशांचा स्वैर मराठी अनुवाद उपलब्ध करून देत आहे तो खालील प्रमाणे:-

*(या मराठी अनुवादाखाली इंग्रजी भाषेतील मूळ आदेश दिला आहे.)*

~ ~ ~

वाळू आणि गौण खनिजाच्या अनधिकृत उत्खनन आणि वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन विविध पद्धती आणि उपायांचे नियोजन करीत आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (ज्याला यापुढे थोडक्यात म.ज.म.अ. असे संबोधित केले आहे) कलम ४८(७) आणि ४८(८) मध्ये दिनांक १२.६.२०१५ पासून अधिसूचना क्र. १२/२०१५ अन्वये मोठ्याप्रमाणात सुधारणा करून त्यात अधिक कडक तरतुदींची व्यवस्था करण्यात आली आहे.

म.ज.म.अ. ४८(८)(१) मध्ये सुधारणा करून, *जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही महसुल अधिकाऱ्यास, ज्यावरील हक्क राज्य शासनाकडे निहित आहे व राज्य शासनाचे ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, हलविलेले, गोळा केलेले, दुसऱ्या जागी नेलेले, उचलून घेतलेले किंवा विल्हेवाट लावलेले कोणतेही खनिज ताब्यात घेता येईल व ते सरकारजमा करता येईल, आणि तसेच त्यास, गौण खनिजे अनिधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली कोणतीही यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि त्यांच्या वाहतुकीकरिता नेमलेली वाहतुकीची कोणतीही साधने ताब्यात घेता येतील आणि ती जप्त करून सरकारजमा करता येतील* अशी तरतुद करण्यात आली आहे.

म.ज.म.अ. ४८(८)(१) अन्वये केलेली वाहन जप्तीची कारवाई आणि त्यानंतर म.ज.म.अ. ४८(७) अन्वये केलेली दंडात्मक कारवाई याला आव्हान देणारी अनेक प्रकरणे उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत.

सामान्यतः अशा प्रकरणांत दाखल केलेल्या कागदपत्रे व अभिलेखांचा अभ्यास करतांना असे निदर्शनास येते की, बेकायदेशीर कामात गुंतलेले असल्याच्या संशयावरून पोलीस अधिकारी एखादे वाहन अडकवून ठेवल्यानंतर संबंधित तहसिलदारला लेखी कळवितात. सदर तहसिलदार, जो त्याच्या कामात अत्यंत व्यस्त असतो, तो



Scanned by CamScanner

त्याच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या एखाद्या अन्य महसूल अधिकाऱ्यास (अनेकदा मंडल अधिकारीपेक्षा कमी दर्जाच्या) याबाबत एकतर तोंडी किंवा लेखी सूचना देतो किंवा प्राधिकृत करतो.

असा, संबंधित तहसिलदारला दुय्यम असणारा महसूल अधिकारी, सदर अडकवून ठेवलेले वाहन/ गौण खनिज ज्या ठिकाणी ठेवलेले असते तेथे जातो, आणि वाहतूक परवाना, गौण खनिजाचे वजन, वाळूचे/गौण खनिजाचे प्रमाण/ भार याबाबत चौकशी करून संबंधित वाहन आणि त्यात आढळलेले गौण खनिज जप्त करतो.

सदर महसूल अधिकारी, जो तहसिलदारपदापेक्षा कमी दर्जाचा असतो, तो संबंधित आक्षेपार्ह वाहन आणि त्यात आढळलेले गौण खनिज जप्त करतो. आणि जप्तीचा पंचनामा तयार करून त्याचा अहवाल संबंधित तहसिलदारला सादर करतो. त्यानंतर तो तहसिलदार, त्या काढलेल्या, हलविलेल्या, गोळा केलेल्या, दुसऱ्या जागी नेलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या गौण खनिजाबाबत म.ज.म.अ. ४८(७) अन्वये दंडाचा आदेश पारित करतो.

म.ज.म.अ. ४८(८)(२) अन्वये अशी जप्त केलेली यंत्र सामुग्री आणि/किंवा वाहने, जप्त केल्यापासून अठ्ठेचाळीस तासाच्या आत, जिल्हाधिकारी किंवा या कारणासाठी सक्षम असलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यासमोर हजर करणे आवश्यक आहे जो अशा काढलेल्या, हलविलेल्या, गोळा केलेल्या, दुसऱ्या जागी नेलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या गौण खनिजासाठी वापरण्यात आलेली वाहने, म.ज.म.अ. ४८(८)(२) अन्वये लादलेल्या अटींना आधिन ठेवून सोडून देऊ शकेल.

असे निदर्शनास आले आहे की, जप्तीच्या कारवाई विरूध्द दाखल झालेल्या अशा याचिकांमध्ये आव्हानाचे तीन पैलू दिसून येतात.
आव्हानाचा पहिला मुद्दा आहे की, म.ज.म.अ. च्या तरतुदींखाली पोलीस आक्षेपार्ह वाहन अडकवून ठेऊ शकत नाही. आव्हानाचा दुसरा मुद्दा म्हणजे, जप्तीची कारवाई आणि जप्तीचा पंचनामा तहसिलदारपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने करणे जे म.ज.म.अ. ४८(८)(१) च्या तरतुदींच्या विरूध्द आहे आणि आव्हानाचा तिसरा मुद्दा म्हणजे, म.ज.म.अ. ४८(८)(२) च्या तरतुदीनूसार जप्त केलेले वाहन सक्षम अधिकाऱ्यासमोर, जप्त केल्यापासून अठ्ठेचाळीस तासाच्या आत हजर केले जात नाही.

मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपुर (कोरम: मा. श्रीमती व्हि. ए. नाईक आणि मा. श्री. ए. एस. चांदुरकर, जज्ज) यांच्या समोर सुनावणीस आलेल्या बऱ्याच याचिकांमध्ये, मंडलअधिकारी, जो तहसिलदारपेक्षा कमी दर्जाचा महसूल अधिकारी आहे, याने आक्षेपार्ह वाहनांच्या जप्तीची कारवाई आणि जप्तीचा पंचनामा केला या एकमेव कारणामुळे ती कारवाई रद्द करण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाने अगदी स्पष्टपणे निर्देशित केले आहे की, म.ज.म.अ. ४८(८)(१) अन्वये, जिल्हाधिकारी यांनी तहसिलदारला प्रदान केलेली कर्तव्ये आणि अधिकार, तहसिलदारने पुन्हा खाली उप-प्रदान करणे योग्य नाही. (तहसिलदारला तसे करता येणार नाही.)



Scanned by CamScanner

मा. उच्च न्यायालयाने, याचिका (रिट पिटिशन) क्रमांक ६४८१/२०१५, ६४८२/२०१५, ६४१२/२०१५ आणि ६४६८/२०१५ या प्रकरणांत, वाहन जप्तीची कारवाई आणि वाळूच्या अवैध वाहतुकीवर केलेली कारवाई, मंडल अधिकारी यांनी त्यांना अधिकार नसतांना केलेली कारवाई ठरवून रद्द केलेली आहे आणि जप्त केलेले वाहन सोडून देण्याचे आदेश दिले आहेत. त्याची प्रत आपल्या अवलोकनासाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडलेली आहे.

महोदया/महोदय, आपणांस विनंती करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाच्या उपनिर्दिष्ट आदेशाच्या प्रती आपल्या अधिनस्त तहसिलदारांकडे पाठविण्यात याव्यात आणि त्यांना निर्देश/मार्गदर्शन करण्यात यावे की, त्यांनी, जिल्हाधिकारी यांनी त्यांना म.ज.म.अ. कलम ४८(८)(१) अन्वये त्यांना प्रदान केलेले अधिकार पुन्हा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांना उप-प्रदान करू नयेत आणि उपरोक्त अधिकारांचा वापर करून आक्षेपार्ह यंत्र सामग्री आणि वाहने जप्त करतांना स्वत: समक्ष हजर राहावे. तसेच जप्त केलेली आक्षेपार्ह यंत्र सामग्री आणि वाहने जप्त केल्यानंतर, म.ज.म.अ. कलम ४८(८)(२) अन्वये, जप्त केल्यापासून अठ्ठेचाळीस तासाच्या आत उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यासमोर हजर करावीत ज्यामुळे त्यांना अशा प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

अनधिकृत गौण खनिज, यंत्रसामुग्री आणि वाहने जप्तीची कारवाई, म.ज.म.अ. मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन न करता केल्यास ती कायद्याच्या न्यायालयात आव्हानित करण्यात येते, आणि न्यायालयीन छाननीत पराभव स्वीकारावा लागतो.

उपरोक्त तरतुदींचे पूर्णपणे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे. म.ज.म.अ. कलम ४८ चे पूर्णपणे काटेकोर पालन केल्यास आपण निश्चितपणे अवैध गौणखनिज उत्खननावर आणि त्याच्या वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेऊ शकू. या प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन आपल्या अधिनस्त संबंधित अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

आपला विश्वासू
(अंबरीश जोशी)
सहाय्यक सरकारी अभियोक्ता,
मुंबई उच्च न्यायालय,
नागपुर खंडपीठ, नागपुर

धन्यवाद
नागपुर
दिनांक २९.१.२०१६



Scanned by CamScanner